आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार, दिनांक ०९ ऑक्टोबर २०२३

ठळक बातम्या

- पाच राज्यातल्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर.
- राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना आमदारांच्या अपात्रतेबाबतच्या याचिकांची सुनावणी एकत्र करण्याचे विधानसभा अध्यक्षांना निर्देश.
- 67व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध शासकीय विभागाने करावयाच्या तयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न.

आणि

- 'ई-नझूल प्रणाली' वापरकर्त्यांसाठी सुलभ करण्याच्या नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिद्री यांच्या सूचना.

********

विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम

निवडणूक आयोगानं आज राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड आणि मिझोराम या पाच राज्यांतल्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी नवी दिल्लीत पत्रकारपरिषदेत जाहीर केला. छत्तीसगड विधानसभेसाठी दोन टप्प्यात मतदान होणार असून पहिला टप्पा ७ नोव्हेंबरला तर दुसरा टप्पा १७ नोव्हेंबरला होणार आहे. मिझोराममध्ये ७ नोव्हेंबरला तर मध्य प्रदेशमध्ये १७ नोव्हेंबरला, राजस्थानमध्ये २३ नोव्हेंबरला आणि तेलंगणामध्ये ३० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. सर्व राज्यांची मतमोजणी ३ डिसेंबरला होणार आहे. २०२४ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी होणाऱ्या या शेवटच्या विधानसभा निवडणुका असल्याने त्यांना विशेष महत्त्व असल्याचं राजीव कुमार म्हणाले. या पाच राज्यांमध्ये मिळून विधानसभेच्या ६७९ जागा आणि १६ कोटी मतदार आहेत. यात सुमारे ६० लाख मतदार प्रथमच मतदान करणार आहेत. या राज्यांमध्ये १७ हजार ७३४ आदर्श मतदान केंद्रे असतील. सर्व मतदान केंद्रांवर खात्रीशीर किमान मूलभूत सुविधा उपलब्ध असतील. नागरिक कोणत्याही प्रकारच्या निवडणूक गैरप्रकारांची सी व्हिजिल ॲपद्वारे निवडणूक आयोगाकडे कडे

तक्रार करू शकतात. प्रत्येक तक्रारीला १०० मिनिटांत प्रतिसाद मिळेल, असं कुमार यांनी सांगितलं.

आमदारांच्या अपात्रता

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या अपात्रतेबाबत जयंत पाटील यांची याचिका आणि उद्धव ठाकरे यांची याचिका एकत्र करण्याचो निर्देश सर्वोच्च न्यायलयानं विधानसभा अध्यक्षांना दिले आहेत. अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर सर्वोच्च न्यायालयानं आज हे नर्देश दिले. विधानसभा अध्यक्षांना जुलै महिन्यात निवेदन दिल्यानंतर दोनदा स्मरणपत्र पाठवुनही फुटीर आमदारांना अध्यक्षांनी जबाब नोंदवण्यासाठी बोलावलं नाही, असा आरोप या निवेदनात करण्यात आला होता. पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात केलेल्या याचिकेत निवडणूक आयोगा समोर या संदर्भात सुरू असलेल्या सुनावणीचा उल्लेख या बाबत पुढील सुनावणी **13** ऑक्टोबरला होणार आहे.

केंद्रीय मंत्री अमित शाह

केंद्र सरकारनं  देशातल्या सर्व सहकारी संस्थांना मजबूत करण्यासाठी अनेक पावलं उचलली असून, त्याअंतर्गत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी देशभरातल्या निबंधक कार्यालयांचं संगणकीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबरोबरच १३ राज्यांमधल्या एक हजार ८५१ कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या संगणकीकरणालाही मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे २२५ कोटी रुपयांच्या या योजनेसाठी एक मध्यवर्ती प्रकल्प देखरेख विभाग स्थापन केला जाईल. या योजनेमुळे या कार्यालयांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि एकसूत्रीपणा येऊन नागरिकांना सुलभ रीतीनं सेवा मिळू शकतील.

सर्बानंद सोनोवाल

देशातल्या सर्व अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थांमध्ये लवकरंच समर्पित आयुष अकादमी सुरू करण्याची घोषणा केंद्रीय आयुषमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केली. ते आज मुंबईत आयुष अभियानाच्या विभागीय आढावाबैठकीत बोलत होते. देशातल्या नागरिकांना प्रत्येक स्तरावरील आधुनिक आणि पारंपारिक औषधोपचार पद्धती उपलब्ध असावी, यासाठी केंद्र सरकारकडून विशेष अभियान राबवलं जाणार

आहे. कोरोना काळात आयुष उपचार पद्धतीचं महत्त्व सर्व जगाला पटलं, असं ते म्हणाले. जागतिक आरोग्य संघटना आणि आयुष मंत्रालय गुजरात मधल्या गांधीनगर इथं पारंपारिक औषधोपचार पद्धतीवर दोन दिवसीय परिसंवादाचं संयुक्तरित्या आयोजन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, अंदमान-निकोबार आदी राज्यातले प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाद्वारे राज्यात गेल्या १५ महिन्यात १५ हजारांपेक्षा जास्त गोरगरीब गरजू रुग्णांना, १२३ कोटी ९० लाख रुपयांची आर्थिक मदत वितरीत करण्यात आली आहे. या कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी काल मुंबईत ही माहिती दिली. ही वैद्यकीय मदत मिळवण्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज नसून, सगळी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होते. यासाठी गरजू रुग्णांनी ८६ ५० ५६ ७५ ६७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असंही चिवटे यांनी सांगितलं.

दीक्षाभूमी आढावा बैठक

दीक्षाभूमी मध्ये येत्या **24** ऑक्टोबर रोजी **67** व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध शासकीय विभागांनी करावयाच्या तयारीच्या अनुषंगाने एक आढावा बैठक आज दीक्षाभूमी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविघालयात आज जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. याप्रसंगी विविध विभागाचे अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. यावर्षी दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांच्या वाढत्या संख्येच्या दृष्टीने महानगरपालिका, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आरोग्य विभाग यांच्याद्वारे केल्या जाणाऱ्या उपाययोजनांच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेत सूचना केल्या. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर होणाऱ्या भोजनदान कार्यक्रमांमध्ये त्याचप्रमाणे इतर आयोजनात सुद्धा स्वच्छतेकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे असे सांगूनयावेळी दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांनी स्वच्छतेचे पालन करून प्लास्टिक कचरा टाळावा असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

राष्ट्रीय टपाल सप्ताह

दरवर्षी डाक विभाग राष्ट्रीय टपाल सप्ताह साजरा करतो, ज्याची सुरुवात आज 9 ऑक्टोबर रोजी जागतिक टपाल दिनापासून होते. या राष्ट्रीय टपाल सप्ताहाच्या

निमित्ताने नागपूर डाक विभागातर्फे सुद्धा विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती नागपूर क्षेत्राच्या पोस्टमास्टर जनरल शुभा मधाळे यांनी आज प्रधान डाकघर - जीपीओमध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये दिली. याप्रसंगी नागपूर शहराच्या टपाल अधीक्षक रेखा रिजवी, पत्र सूचना कार्यालय नागपूरचे उपसंचालक शशिन राय प्रामुख्याने उपस्थित होते. नागपूर क्षेत्रात विदर्भातील 11 महसूल जिल्ह्यांचा समावेश आहे ज्यात 8 टपाल विभाग, 1 रेल्वे मेल सेवा आणि पोस्टल स्टोअर डेपो आणि मेल मोटर सेवेची दोन कार्यालय इत्यादींचा समावेश आहे. या सर्व विभागांमध्ये आजपासून टपाल सप्ताहाला सुरुवात झाली असून उद्या 10 ऑक्टोबर रोजी वित्तीय सशक्तिकरण दिवस, 11 ऑक्टोबर रोजी फिलाटली डे चे आयोजन करण्यात आले असून या अंतर्गतशालेय मुलांसाठी एक छंद म्हणून फिलाटलीबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी फिलाटेलिक क्विझ स्पर्धा, फिलाटेलिक सेमिनार आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातील.12 ऑक्टोबर रोजी मेल आणि पार्सल दिवस, 13 ऑक्टोबर रोजी अंत्योदय दिवस, साजरा केला जाणार आहे. दरम्यान, नागपूर क्षेत्र डाक विभागातर्फे घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती शोभा मधाळे यांनी दिली .त्यांनी सांगितलं की व्यापार टपालाचे प्रमाण हे पारंपारिक टपालापेक्षा जास्त वाढले असून स्पीड पोस्ट ही सेवा इतर खाजगी सेवांच्या तुलनेत अतिविश्वसनीय ठरली आहे . इंडियन पोस्ट पेमेंट बँकेचे 18 लाख 90 हजार खाते संपूर्ण विदर्भात उघडले असून प्रामुख्याने ग्रामीण भागात जिथे बँकिंग व्यवस्था पोहोचली नाही तिथे हे खाते पोहोचले आहेत असे देखील या पत्र परिषदेत स्पष्ट करण्यात आले.

ई-नझूल

नागपूर शहरातील नझूलच्या जमीनी, जागा तसेच त्यांच्या वापरासंदर्भातील एकत्रित माहिती ई-नझूल प्रणालीद्वारे उपलब्ध होणार आहे. ही प्रणाली वापरकर्त्यांना सहज वापरता येईल व पाहता येईल, अशी तयार करा, अशा सूचना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज नागपुरात दिल्या. नागपूर जिल्हा नझूल कार्यालयाच्यावतीने ‘ई-नझूल प्रणाली’ तयार करण्यात येत आहे. या प्रणालीचे सादरीकरण श्रीमती बिदरी यांच्या दालनात करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यावेळी उपस्थित होते. नागपूर शहरात जवळपास **10** हजार **700** ठिकाणी नझुलची जमीन आहेत. संबंधित नझूल जागेचे छायाचित्र अपलोड करणे, त्या जागेचा खसरा क्रमांक, नझूल भुखंड क्रमांक, बांधकाम परवानगी, तारण परवानगी आदींची माहिती सहज उपलब्ध व्हावी आणि त्यासाठी वाचण्यायोग्य फॉन्ट व फॉन्ट

साईज वापरावा अशी सूचनाही त्यांनी केली. या प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या काही संज्ञा व त्यांची नावे अधिक सोपी करण्यासंदर्भात सूचना देत या संज्ञांचा अर्थ संबंधित 'ई-प्रणालीत'च दिल्यास अर्जदाराला या प्रणालीचा वापर करणे अधिक सुलभ होईल आणि प्रशासनावरील तानही कमी होईल, असेही बिदरी यांनी सांगितले.

******